| | |
|---|---|
| MHST160009012012 | नि.दि.मु.क्र.३०३/२०१२ मधील नि.१५१ वरील आदेश<br><br>(श्री.राजेंद्र बबन काकडे<br>वि.<br>श्री.उमेश बबन काकडे)<br><br>(पारित दिनांक १२.०७.२०२४) |

वादींनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.४ श्रीमती मंगल विजय सावंत हया मयत झाल्याने त्यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादींचे असे म्हणणे आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.४ श्रीमती मंगल विजय सावंत हया दिनांक ३०.०७.२०२२ रोजी मयत झाल्या आहेत. प्रतिवादी क्र.४ यांचे मृत्यू बाबतचे रेकॉर्ड लवकर उपलब्ध न झालेने त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे त्यांच्या विरूध्द अबेटमेंटचा आदेश पारीत झालेला आहे. त्यांनी प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर घेण्यास जाणुनबुजुन उशीर केलेला नाही. सबब वादींनी प्रतिवादी क्र.४ चे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्याने झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवुन मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. सदरचा अर्ज त्यांना मान्य व कबूल नाही. प्रतिवादी नं.४ब यांचे करीता पालनकर्ता या नात्याने नेमणूक करण्याकरीता कायदेशीर तरतुदी प्रमाणे वादी यांनी मे.कोर्टाची परवानगी घेणे आवश्यक व जरूरीचे आहे. या कारणाने वादी यांचा सदरचा अर्ज कायदयाने चालणार नाही. या कारणाने सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. त्यांचे पुढे असे कथन आहे की, दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास सदरची दुरूस्ती कशी आवश्यक आहे हे त्यांनी सदर अर्जात नमूद केले नाही. सबब सदरचा अर्ज खर्चासह नाकारण्याबाबत प्रतिवादी यांनी विनंती केली आहे.

४. वादीचा अर्ज व प्रतिवादीचे म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादीं विरुध्द वाद मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटपासाठी दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र.४ श्रीमती मंगल विजय सावंत हया दिनांक ३०.०७.२०२२ रोजी क्षेत्रमाहुली,सातारा येथे मयत झाल्या आहेत. त्यांच्या मृत्यूच्या दाखल्याची प्रत नि.क्र.१३९ वर दाखल आहे. तसेच वादीला मयत प्रतिवादी क्र.४ चे वारसांविरुद्ध दावा चालविण्याचा अधिकार आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता, तसेच दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता मयताचे वारसांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्या करीता प्रतिवादी क्र.४ चे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होणे गरजेचे आहे. करीता, सदरचा अर्ज मंजुर करणे योग्य होईल. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आ दे श</u>

१. अर्ज (नि.क्र.१५१) मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.४ चे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणेत येतो.

ठिकाण - वाई. **(एस. एस. कुलकर्णी)**

दिनांक - १२.०७.२०२४. चौथे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.